# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०१८/ 95
दिनांक :- 10 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या
पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- MahaDBT पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज सबंधित विभागाकडे त्वरीत पाठविण्याबात.**
**संदर्भ :-** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, तसेच मा.प्रधानसचिव, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दिनांक १०/१/२०१८ रोजीच्या सुचना.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता विविध योजनेकरीता शासनाचे **MahaDBT पोर्टलवर** आपल्या संस्थेतील एस.सी./एस.टी/व्हीजेएनटी/ओबीसी व अन्य प्रवर्गातील प्रवेशित ज्या पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत अश्या विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून आपल्या स्तरावरुन Approved करुन **दिनांक २०/१/२०१९ पर्यंत** संबंधित विभागाकडे (सामाजिक न्याय विभाग, व आदिवासी विकास विभाग आणि तंत्रशिक्षण विभाग) यांचेकडे मंजुरीकरीता सादर करावे अश्या प्रकारच्या सुचना मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन तसेच मा.प्रधानसचिव, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी दिनांक १०/१/२०१९ रोजी व्ही.डी.ओ. कॉन्फरन्स व्दारे दिलेल्या आहेत तरी त्याप्रमाणे कार्यवाही करावी. जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ लाभ मिळणे शक्य होईल.

तसेच आपणास कळविण्यात येते की, अर्ज प्रलंबित राहील्यास त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीबाबत काही नुकसान झाल्यास आपण जबाबदार राहणार, याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी तसेच जर कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहील्यास सबंधित विद्यार्थ्याकडून आपल्या महाविद्यालयास घ्यावयाची फी वसुल करता येणार नाही, याची सुध्दा संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.